सत्यमेव जयते

GOVERNMENT OF MAHARASHTRA

MAHARASHTRA STATE COMMON ENTRANCE TEST (CET) CELL

8th Floor, New Excelsior Building, A.K. Nayak Road, Fort, Mumbai 400 001

Tele. No. - 022-22016157/53/59 Website -www.mahacet.org E-Mail-cetcell@mahacet.org

No.MED-1026/C.R.No.83/Stray Vacancy Round/Instructions/2274 Date : 12/10/2026

NOTICE NO.24
NEET UG 2026

Regarding Stray Vacancy Rounds
Important Instructions to Candidates and Colleges

The Schedule for Stray Vacancy round(s) for MBBS & BDS (Group A) is declared as per notice no. 23, dated 12/10/2026 on the official website of State CET Cell for the knowledge of the candidates and colleges. As per the admission rules of 2026, the Institute level round in Private Colleges is cancelled and it is mentioned that all the admissions will be done by the State CET cell by conducting Online Stray Vacancy Rounds. In view of the rules and in order to conduct multiple stray vacancy rounds which will enable filling of vacant seats, all the candidates and colleges should follow the below directions as applicable.

1. The Stray Vacancy round is the last round of the admission process. However, in order that the seat is not wasted multiple stray vacancy rounds will be conducted.
2. Candidates have to fill fresh choice for each stray vacancy round. The allotment will done merit wise and preference wise.
3. **It is mandatory to join the seat allotted in Stray Vacancy Round. Candidates should fill only those choices in which they are interested.** If a candidate is allotted any college and does not report to the college within the given time, s/he will be liable for action as per Information Brochure.
4. As per NEET UG-2026 Information Brochure Clause 20.
   DISQUALIFICATION FOR ADMISSION
   The selected candidates who do not report or do not join their allotted seat in the last round of the admission process thereby resulting in lapse of seat, shall not be eligible for admission for subsequent two years for that group.
5. Candidates will be allowed to edit the choices multiple times by unlocking using OTP to be shared on their email and mobile number upto the given time schedule as per the notice. However, no preference can be edited once time schedule is over.
6. Candidates should ensure that they have filled the correct college and course; any request for change in the preferences will not be entertained subsequently.

7. As there is no betterment after this round, the candidate is expected to pay the fee by way of DD or by NEFT/RTGS.

8. Candidates should ensure the fees to be paid to the college from Fees Regulating Authority (FRA) and College website before filling the choice.

9. Each college shall publish the quota wise fees along with Account details for Payment. The fees should be as decided by Fees Regulating Authority (FRA).

10. All the colleges should note that since the joining period is limited, the candidates might not be able to submit a DD, therefore payment by way of NEFT/RTGS shall be allowed during Stray Vacancy Round. The college should publish all the details required for NEFT/RTGS before the start of the Stray Vacancy Round, which will enable the candidates to make necessary arrangements.

All the candidates should visit State CET Cell official website i.e.www.mahacet.org for updates.

Sd/-
Commissioner
Maharashtra State Common Entrance
Test (CET) Cell, Mumbai

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०००01.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.वैशिप्र-१०२६/प्र.क्र.८३/युजी २०२६/स्ट्रे.व्हॅ.प्रवेश फेरी/सुचना/२२७४ दिनांक : १२/१०/२०२६

सूचना क्र. २४
नीट युजी २०२६

स्ट्रे व्हॅकन्सी प्रवेश फेरीसंदर्भात
उमेदवार व शैक्षणिक संस्था करीता महत्वाच्या सूचना

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील एमबीबीएस व बीडीएस (ग्रुप ए) अभ्यासक्रमांच्या स्ट्रे व्हॅकन्सी प्रवेश फेरींचे वेळापत्रक राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर सूचना क्र. २३, दिनांक १२/१०/२०२६ अन्वये उमेदवार व महाविद्यालयांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आले आहे. **शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रवेश नियमांनुसार, खासगी महाविद्यालयांमधील संस्था स्तरावरील प्रवेश फेरी रद्द करण्यात आली असून, सर्व प्रवेश हे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत ऑनलाइन स्ट्रे व्हॅकन्सी प्रवेश फेऱ्या आयोजित करून करण्यात येणार आहेत.** रिक्त जागा भरण्याच्या दृष्टीने एकापेक्षा अधिक स्ट्रे व्हॅकन्सी प्रवेश फेऱ्या आयोजित करण्यात येणार असल्याने, प्रवेशाबाबत लागू असलेल्या खालील सूचनांचे सर्व उमेदवार व महाविद्यालयांनी पालन करावे.

१. स्ट्रे व्हॅकन्सी प्रवेश फेरी ही प्रवेश प्रक्रियेतील अंतिम फेरी आहे. तथापि, जागा रिक्त राहू नयेत आणि त्या भरल्या जाव्यात, या उद्देशाने एकापेक्षा अधिक स्ट्रे व्हॅकन्सी प्रवेश फेऱ्या आयोजित करण्यात येतील.

२. प्रत्येक स्ट्रे व्हॅकन्सी प्रवेश फेरीसाठी उमेदवारांनी नव्याने पसंतीक्रम (Choices) भरावेत. गुणवत्ता यादीतील क्रमवारी (Merit) आणि उमेदवारांनी दिलेला पसंतीक्रम यानुसार जागांचे वाटप करण्यात येईल.

३. स्ट्रे व्हॅकन्सी प्रवेश फेरीत वाटप झालेल्या जागेवर प्रवेश घेणे अनिवार्य आहे. उमेदवारांनी केवळ त्यांना प्रवेश घेण्याची इच्छा असलेल्या महाविद्यालयांचेच पसंतीक्रम भरावेत. एखाद्या उमेदवारास महाविद्यालयातील जागा वाटप झाल्यानंतर विहित मुदतीत संबंधित महाविद्यालयात प्रवेशासाठी हजर न राहिल्यास, त्याच्यावर प्रवेश माहिती पुस्तिकेतील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येईल.

४. नीट युजी-२०२६ प्रवेश माहिती पुस्तिकेतील अ.क्र. २० नुसार
प्रवेशासाठी अपात्रता (Disqualification for Admission) या तरतुदीनुसार, प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम फेरीत निवड झाल्यानंतरही संबंधित महाविद्यालयात हजर न राहणारे किंवा वाटप झालेल्या जागेवर प्रवेश न घेणारे आणि त्यामुळे ती जागा रिक्त राहण्यास कारणीभूत ठरणारे उमेदवार, संबंधित गटाच्या पुढील दोन वर्षांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी अपात्र ठरतील.

५. सूचनेत नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार विहित मुदतीपर्यंत उमेदवारांना त्यांच्या ई-मेल व मोबाईल क्रमांकावर पाठविण्यात येणाऱ्या OTP च्या साहाय्याने पसंतीक्रम अनलॉक करून त्यात अनेक वेळा बदल करता येतील. तथापि, विहित वेळापत्रकाची मुदत संपल्यानंतर पसंतीक्रमात कोणताही बदल करता येणार नाही.

६. उमेदवारांनी पसंतीक्रम भरताना योग्य महाविद्यालय व अभ्यासक्रम निवडल्याची खात्री करावी. पसंतीक्रम भरल्यानंतर त्यामध्ये बदल करण्याबाबतची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

७. या प्रवेश फेरीनंतर बेटेरमेंट (Betterment) करण्याची संधी उपलब्ध नसल्यामुळे, उमेदवारांनी प्रवेशासाठी आवश्यक शुल्काचा भरणा डिमांड ड्राफ्ट (DD) किंवा NEFT/RTGS द्वारे करण्याची तयारी ठेवावी.

८. उमेदवारांनी पसंतीक्रम भरण्यापूर्वी संबंधित महाविद्यालयाचे शुल्क नियामक प्राधिकरणाने (FRA) निर्धारित केलेले शुल्क तसेच महाविद्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असलेली शुल्कविषयक माहिती तपासून घ्यावी.

९. प्रत्येक महाविद्यालयाने प्रवर्ग/कोट्यानुसार लागू असलेले शुल्क तसेच शुल्क भरण्यासाठी आवश्यक असलेले बँक खात्याचे तपशील महाविद्यालयांचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करावेत. आकारण्यात येणारे शुल्क शुल्क नियामक प्राधिकरणाने (FRA) निर्धारित केलेल्या शुल्कानुसारच असावे.

१०. प्रवेशासाठी हजर राहण्याचा कालावधी मर्यादित असल्यामुळे उमेदवारांना डिमांड ड्राफ्ट (DD) सादर करणे शक्य होईलच असे नाही, याची सर्व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी. त्यामुळे स्ट्रे व्हॅकन्सी प्रवेश फेरीदरम्यान NEFT/RTGS द्वारे शुल्क भरण्याची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. उमेदवारांना शुल्क भरण्याची आवश्यक व्यवस्था करता यावी, यासाठी प्रत्येक महाविद्यालयाने स्ट्रे व्हॅकन्सी प्रवेश फेरी सुरू होण्यापूर्वी NEFT/RTGS द्वारे शुल्क भरण्यासाठी आवश्यक असलेले सर्व तपशील प्रसिद्ध करावेत.

सर्व उमेदवारांनी अद्ययावत माहितीसाठी महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळास www.mahacet.org भेट द्यावी

स्वाक्षरी/-
आयुक्त
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा
(सीईटी) कक्ष, मुंबई